# मेट्रो ३ : सिद्धिविनायक मेट्रो स्थानकात पहिला एस्कलेटर चाचणीसाठी सज्ज



**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेदरम्यानच्या दादर सिद्धिविनायक मेट्रो स्थानकामध्ये पहिले एस्कलेटरचे सेटअप बसवण्यात आले असून, ते चाचणीसाठी सुसज्ज असल्याचे एमएमआरसीएलकडून सांगण्यात आले आहे.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या भुयारी मेट्रो मार्गिकेदरम्यान स्थानकातील महत्त्वाचे स्थानक म्हणून दादर सिद्धिविनायक स्थानकाकडे पाहिले जाते. त्यामुळे हे एस्कलेटर १८ दिवसांच्या विक्रमी वेळेत कार्यान्वित करण्यात आले असून, गणेश चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर चाचणीसाठी सज्ज ठेवण्यात आल्याचे एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांनी स्पष्ट केले आहे. या एस्कलेटरच्या माध्यमातून ७३०० जण प्रत्येक तासाला वापरू शकणार असून, जास्तीत जास्त ऑपरेशनल स्पीड ०.६५ मीटरर्स दर सेकंद तसेच कमीत कमी ०.५ मीटर्स प्रति सेकंद असा राहणार आहे. कमीत कमी कार्यप्रणालीतही ६ हजार जण वापरू शकणार आहेत.